महाराष्ट्र शासन

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर

आदिवासी विकास भवन, आर. टी. ओ. ऑफीस समोर गिरीपेठ, अमरावती रोड,

नागपूर ४४००१०

दूरध्वनी क्र. २५६०३१४ फॅक्स क्र. २५६५००८

E_mail : atcngpest@gmail.com

## जाहिरात

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र- RBTC/१३०१३(४)/Notification-१/४७४/२०१४, Dated ०९.०६.२०१४ रोजी अधिसूचना प्रसिध्द करुन विविध विभागातील सुमारे १७ संवर्गाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यापैकी आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील वर्ग-३ संवर्गातील शिक्षक व आदिवासी विकास निरिक्षक ही पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरावयाचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर पदे भरण्यासाठी आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आस्था-२०१६/प्र.क्र.३८७/(भाग-१)/का.१५ दिनांक १ डिसेंबर २०१८ मधील तरतुदीनुसार आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील पदे भरण्यासाठी विशेष भरती प्रक्रिया राबविण्याबाबत निर्देश आहेत.

रोजंदारी / तासिका तत्वावरील कर्मचाऱ्याच्या सेवा नियमित करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल रिट याचिका क्रमांक ५८६७/२०१५ व इतरच्या अनुषंगाने दिनांक ३१.१०.२०१८ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाबाबत मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे दाखल अपील प्रकरणाच्या निर्णयाच्या अधिन राहून अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर अंतर्गत ३० नोव्हेंबर २०१८ अखेरची अनुसूचित क्षेत्रातील उच्च माध्यमिक शिक्षण सेवक, माध्यमिक शिक्षण सेवक व प्राथमिक शिक्षण सेवक या तीन संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता सदरची जाहिरात प्रसिध्द करण्यांत येत आहे.

मिनीस्ट्री ऑफ लॉ ॲण्ड जस्टीस, लेजिस्लेटीव्ह डिपार्टमेंट, नोटिफिकेशन, नवी दिल्ली यांनी दिनांक २.१२.१९८५ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील नमूद असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील गावांच्या यादीमध्ये मा. राज्यपाल महोदयांच्या ९ जून २०१४ च्या अधिसुचनेतील अटी शर्तींची पुर्तता करीत असलेल्या गडचिरोली व चंद्रपूर या जिल्हयातील अनुसुचित क्षेत्रातील अनुसूचित जमाती या प्रवर्गातील स्थानिक उमेदवारांकडून खालील तपशिला प्रमाणे शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षक संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नांव | माध्यम | पदाची संख्या | एकुण पदे |
|---|---|---|---|
| १) प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | मराठी माध्यम | ३९ | |
| २) प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | इंग्रजी माध्यम | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | माध्यमिक शिक्षण सेवक एकूण पदे २७ | | | |
| | विषय | पदाची संख्या | विषय | पदाची संख्या |
| | गणित | ८ | विज्ञान | १० |
| | इंग्रजी | ६ | जनरल (मराठी/इतिहास/ भुगोल/हिंदी) | ३ |
| | माध्यमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम शाळा) एकूण पदे ०२ | | | |
| ४) माध्यमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम शाळा) | गणित | १ | विज्ञान | ० |
| | इंग्रजी | ० | जनरल (मराठी/इतिहास/ भुगोल/हिंदी) | १ |
| ५) उच्च माध्यमिक शिक्षण सेवक | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक एकूण पदे १३ | | | |
| | विषय | पदाची संख्या | विषय | पदाची संख्या |
| | राज्यशास्त्र | ० | मराठी | ३ |
| | भौतिकशास्त्र | ० | अर्थशास्त्र | २ |
| | रसायनशास्त्र | ० | इतिहास | ० |
| | गणित | ६ | भुगोल | ० |
| | जीवशास्त्र | १ | इंग्रजी | १ |
| एकुणात ८२ पदे | | | | |

## समांतर आरक्षणाची पदसंख्या

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प | | रिक्त पद संख्या | महिला ३०% | अपंग ३% | मा.सै. १५% | खेळाडू ५% | अंशकालीन कर्मचारी १०% | भुकंपग्रस्त २% | प्रकल्पग्रस्त ५% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | चंद्रपूर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण चंद्रपूर जिल्हा | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २ | गडचिरोली | १६ | ५ | ० | २ | १ | २ | ० | १ | ० | ५ |
| ३ | अहेरी | १३ | ४ | ० | २ | १ | १ | ० | १ | ० | ४ |
| ४ | भामरागड | ९ | ३ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ४ |
| एकूण गडचिरोली जिल्हा | | ३८ | १२ | ० | ५ | २ | ४ | ० | २ | ० | १३ |
| एकूण प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | | ३९ | १२ | ० | ५ | २ | ४ | ० | २ | ० | १४ |

## समांतर आरक्षणाची पदसंख्या

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प | | रिक्त पद संख्या | महिला ३०% | अपंग ३% | मा.से. १५% | खेळाडू ५% | अंशकालीन कर्मचारी १०% | भूकंपग्रस्त २% | प्रकल्पग्रस्त ५% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | चंद्रपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण चंद्रपूर जिल्हा | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | गडचिरोली | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | अहेरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भामरागड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण गडचिरोली जिल्हा | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

## समांतर आरक्षणाची पदसंख्या

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प | | रिक्त पद संख्या | महिला ३०% | अपंग ३% | मा.से. १५% | खेळाडू ५% | अंशकालीन कर्मचारी १०% | भूकंपग्रस्त २% | प्रकल्पग्रस्त ५% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | चंद्रपूर | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| एकूण चंद्रपूर जिल्हा | | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| २ | गडचिरोली | ९ | ३ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ४ |
| ३ | अहेरी | ८ | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ४ |
| ४ | भामरागड | ६ | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | २ |
| एकूण गडचिरोली जिल्हा | | २३ | ७ | ० | ३ | ० | ३ | ० | ० | ० | १० |
| एकूण माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | | २७ | ८ | ० | ४ | ० | ३ | ० | ० | ० | १२ |

## समांतर आरक्षणाची पदसंख्या

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | माध्यमिक शिक्षण सेवक(इंग्रजी माध्यम) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प | | रिक्त पद संख्या | महिला ३०% | अपंग ३% | मा.सै. १५% | खेळाडू ५% | अंशकालीन कर्मचारी १०% | भुकंपग्रस्त २% | प्रकल्पग्रस्त ५% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | चंद्रपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण चंद्रपूर जिल्हा | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | गडचिरोली | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | अहेरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भामरागड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण गडचिरोली जिल्हा | | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकूण माध्यमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

## समांतर आरक्षणाची पदसंख्या

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प | | पद संख्या | महिला ३०% | अपंग ३% | मा.सै. १५% | खेळाडू ५% | अंशकालीन कर्मचारी १०% | भुकंपग्रस्त २% | प्रकल्पग्रस्त ५% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | चंद्रपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण चंद्रपूर जिल्हा | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | गडचिरोली | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ३ | अहेरी | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ४ | भामरागड | ७ | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ |
| एकूण गडचिरोली जिल्हा | | १३ | ४ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ७ |
| एकूण | | १३ | ४ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ७ |

टिप:- १) वर नमुद केलेल्या समांतर आरक्षणात व पदसंख्येत बदल होऊ शकतो.
https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर जाहिरात व पद भरती संबंधीच्या सविस्तर सूचना उपलब्ध असून, दिनाक १२.१२.२०१८ ते दिनांक ०६.०१.२०१९ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यत पात्रता धारक उमेदवारांनी अर्ज करावेत. तसेच दिनांक ०७.०१.२०१९ पर्यत चलन भरावे.

| | |
|---|---|
| पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा: | गट क |
| शिक्षण सेवक कालावधी असल्यास | शिक्षण सेवक कालावधी ३ वर्षाचा आहे |
| नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ? | होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार नियुक्ती समाप्त करण्यात येते. |
| (अ) कर्तव्य | आश्रमशाळा संहिता व वेळोवेळी दिलेल्या निर्देशा नुसार सोपविण्यात आलेली कर्तव्ये |
| (ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण/ ठिकाणे | १) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभागातील चंद्रपूर / गडचिरोली या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा<br>२) उमेदवार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभागाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत ज्या जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असेल त्याच जिल्ह्यातील प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत सेवा करावी लागेल.<br>३) समायोजन, नविन पदनिर्मिती इत्यादी प्रशासकीय कारणांमुळे जेथे पदस्थापना दिली जाईल त्या ठिकाणी. |
| निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ? | नियुक्ती / पदस्थापना आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत |
| मानधन (नियुक्तीपासून ३ वर्षासाठी ) त्यानंतर कामकाज समाधानकारक आढळल्यास नियमित वेतनश्रेणी लागू होईल. | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक :- ९०००/-<br>माध्यमिक शिक्षण सेवक :- ८०००/-<br>प्राथमिक शिक्षण सेवक :- ६०००/-<br>मानधन (प्रतिमाह) |
| पदोन्नतीच्या संधी | शासन नियमानुसार |
| आवश्यक शैक्षणिक अर्हता | खालीलप्रमाणे |

## आवश्यक शैक्षणिक अर्हता

| | | |
|---|---|---|
| १. | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम)(तीन वर्षांकरीता एकत्रित मानधन रुपये ६०००/- प्रति महा) | १. माध्यमिक शालांत परिक्षा किमान ४५ टक्केसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. उच्च माध्यमिक शालांत परिक्षा किमान ४५ टक्के गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. दोन वर्षाची शिक्षणशास्त्र पदविका मध्ये (डी.एड. / डी. टीएड) किमान ४५ टक्के सह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>४. शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.<br>५. शासकीय आश्रम शाळांमध्ये तासिका / रोजंदारी तत्वावर किमान ५ वर्षे |

| | | |
|---|---|---|
| | | सलग सेवा दिली असल्यास त्यांना शिक्षक पदाकरिता पूर्व अर्हता असलेली शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण असण्याच्या अटीत सुट देण्यात येत आहे. तथापि नियमित प्राथमिक शिक्षण सेवक या पदावर निवड होऊन रुजू झाल्यापासून तीन वर्षाचे आत शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. अन्यथा कोणतीही पूर्व सूचना न देता संबंधित उमेदवाराची सेवा समाप्त करण्यांत येईल. |
| २. | प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) (तीन वर्षाकीता एकत्रित मानधन रुपये ६०००/- प्रति महा) | १. उमेदवारांचे इ. १ ली पासूनचे शालेय शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असावे<br>२. माध्यमिक शालांत परिक्षा किमान ४५ टक्केसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>३. उच्च माध्यमिक शालांत परिक्षा किमान ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>४. दोन वर्षाची शिक्षणशास्त्र पदविका मध्ये (डी.एड. / डी. टीएड) किमान ४५ टक्के सह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>५. शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.<br>६. शासकीय आश्रम शाळांमध्ये तासिका / रोजंदारी तत्वावर किमान ५ वर्षे सलग सेवा दिली असल्यास त्यांना शिक्षक पदाकरिता पूर्व अर्हता असलेली शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण असण्याच्या अटीत सुट देण्यात येत आहे. तथापि नियमित प्राथमिक शिक्षण सेवक या पदावर निवड होऊन रुजू झाल्यापासून तीन वर्षाचे आत शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. अन्यथा कोणतीही पूर्व सूचना न देता संबंधित उमेदवाराची सेवा समाप्त करण्यांत येईल. |
| ३. | **माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम)** (तीन वर्षाकरिता एकत्रित मानधन रुपये ८०००/- प्रति महा) | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किमान ४५ टक्के सह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड पदवी उत्तीर्ण असणाऱ्या खालील विषयांचे पात्रताधारक<br>**विषयनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता पुढील प्रमाणे**<br>इंग्रजी- बी.ए.(इंग्रजी), बी.एड.<br>गणित- बी.एससी.(गणित), बी.एड. (ए ग्रुप)<br>विज्ञान- बी.एससी.(विज्ञान), बी.एड. (बी ग्रुप)<br>जनरल- बी.ए.(मराठी / इतिहास / भुगोल/ हिंदी / अर्थशास्त्र इ.); बी.एड. |
| ४. | **माध्यमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम)** (तीन वर्षाकरिता एकत्रित मानधन रुपये ८०००/- प्रति महा) | १. इ. १ ली ते १२ वी पर्यंतचे शालेय शिक्षण इंग्रजी माध्यमातून घेतलेले असावे.<br>२. पदवी परिक्षेला इंग्रजी हा स्पेशल विषय घेवून किमान ४५ टक्केसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>३. बीएड परिक्षा इंग्रजी माध्यमातून किमान ४५ टक्केसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | ४. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किमान ४५ टक्के सह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>५. मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड पदवी उत्तीर्ण असणाऱ्या खालील विषयांचे पात्रताधारक<br>विषयनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता पुढील प्रमाणे |
| | | इंग्रजी- बी.ए.(इंग्रजी), बी.एड.<br>गणित- बी.एससी.(गणित), बी.एड. (ए ग्रुप)<br>विज्ञान- बी.एससी.(विज्ञान), बी.एड. (बी ग्रुप)<br>जनरल- बी.ए.(मराठी / इतिहास / भुगोल/ हिंदी / अर्थशास्त्र इ.), बी.एड. |
| ५. | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक<br>(तीन वर्षाकरिता एकत्रित मानधन रुपये १०००/- प्रति महा) | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किमान ४५ टक्के सह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड पदवी उत्तीर्ण असणाऱ्या खालील विषयांचे पात्रताधारक<br>विषयनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता पुढील प्रमाणे<br>**विषय- इंग्रजी**<br>१. एमए. ( इंग्रजी) किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>२. बी.एड किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक<br>**विषय- गणित**<br>१. एम.एससी. गणित किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>२. बी.एड किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>**विषय- जीवशास्त्र**<br>१. एम.एससी. (जीवशास्त्र) द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>२. बी.एड किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>**विषय- राज्यशास्त्र / समाजशास्त्र / अर्थशास्त्र**<br>१. एमए. (राज्यशास्त्र/समाजशास्त्र/अर्थशास्त्र) किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>२. बी.एड किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>**विषय- मराठी**<br>१. एम.ए. (मराठी) किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक,<br>२. बीएड ला संबंधीत विषयाची अध्यापन पध्दती किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक, |

| | |
|---|---|
| वयोमर्यादा | वरील सर्व पदांसाठी दिनांक ३०.११.२०१८ रोजी वय किमान १८ वर्षे पुर्ण कमाल ४३ वर्षे पुर्ण<br>१. समांतर आरक्षणासाठी वयोमर्यादा<br>१) अपंग- ४५ वर्षे<br>२) माजी सैनिक ४५ वर्षे<br>३) खेळाडू- विहित वयोमर्यादेत ५ वर्षे वयात शिथील<br>४) प्रकल्पग्रस्त- ४५ वर्षे<br>५) अंशकालीन / १९९१ ची जनगणना / १९९४ निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी - ४६ वर्षे<br>६) **शासकीय आश्रमशाळांवर रोजंदारी / तासिका तत्वावर सलग ५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वर्ष काम केले असल्यास त्या उमेदवारांना कमाल वयो मर्यादेची अट ५ वर्षांनी शिथील करण्यांत येईल.** |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| अधिवास | अर्जदार मा.राज्यपाल महोदयांच्या ९ जुन २०१४ च्या अधिसुचनेतील अटी शर्तीची पुर्तता करित असलेल्या गडचिरोली व चंद्रपूर या जिल्हयातील अनुसुचित क्षेत्रातीलच कायम रहिवासी असावा. (वरील दोन जिल्हयातील अनूसुचित क्षेत्राची यादी संलग्न आहे.) |

<u>उमेदवार निवडीची पध्दती</u>

१. शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- आस्था-२०१६/प्र.क्र.३८७(भाग-१)/का.१५, दिनांक १ डिसेंबर, २०१८ मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेतील प्राप्त गुणांच्या आधारे ५० गुणांपर्यंत गुणदान करण्यात येईल.

२. सदर जाहिरातीतील पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संस्कृती, स्थानिक बोलीभाषा ज्ञान, कल, बुध्दीमत्ता चाचणी व आदिवासी प्रति संवेदनशिलता यावर आधारित ३५ गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

३. शिक्षक या पदावर शासकीय आदिवासी आश्रमशाळेत पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे तासिका/ रोजंदारी तत्वावर काम केलेल्या वा करित असलेल्या उमेदवारांना १५ गुणांपैकी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| अ.क्र | कालावधी | गुण |
|---|---|---|
| १. | १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे अनुभव | १५ गुण |
| २. | ८ ते ९ वर्षे अनुभव | १२ गुण |
| ३. | ६ ते ७ वर्षे अनुभव | ८ गुण |
| ४. | ५ वर्षे अनुभव | ५ गुण |

टिप-

- ५ वर्षापेक्षा कमी अनुभवासाठी गुणदान करण्यांत येणार नाही.
- अनुभवाची गणना करतांना ६ किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यासाठी पुर्णांकात गणना करण्यांत येईल.

- शासकीय आश्रमशाळेतील सेवेच्या अनुभवासाठी संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांचे प्रमाण आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्रामध्ये सेवेचा कालावधी नमूद असणे आवश्यक आहे.
- गुणानुक्रमानुसार जिल्हानिहाय तयार करण्यांत आलेल्या उमेदवारांच्या यादी मधुन आवश्यक त्या संख्येत उमेदवारांना त्यांच्या अर्जामध्ये केलेल्या दाव्यानुसार कागदपत्र पडताळणी करिता बोलविण्यात यईल.
- जाहिरातीमध्ये नमूद शिक्षण सेवक पदांकरिता आवश्यक असणाऱ्या अर्हतांची पडताळणी केल्यानंतर जे उमेदवार अंतिमत: पात्र ठरतील त्या उमेदवारांमधुन गुणवत्ता व समांतर आरक्षणानुसार आवश्यकतेनुसार नियुक्तीची कार्यवाही करण्यांत येईल.

## सर्वसाधारण सुचना

| | |
|---|---|
| १. | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर विभागांतर्गत शासकीय आश्रम शाळांमध्ये तासिका / रोजंदारी तत्वावर किमान ५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सलग सेवा केली असल्यास नियमित प्राथमिक शिक्षण सेवक या पदावर निवड होऊन रुजू झाल्यापासून तीन वर्षाचे आत शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test / Central Teacher Eligibility Test) उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. जर तीन वर्षाचे आत सदर परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता सदर उमेदवाराची सेवा संपुष्टात येईल. उर्वरित सर्व उमेदवारांना नियुक्तीपुर्वी TET परिक्षा उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. |
| २. | जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दिनांक ३०.११.२०१८ रोजी गणले जाईल. विहित नमुन्यात केलेल्या अर्ज ऑनलाईन पध्दतीने https://maharecruitment.mahaonline.gov.in या सकेंतस्थळावर अर्ज करावयाचा आहे . उमेदवाराची स्वाक्षरी व फोटो नसलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. |
| ३. | मिनीस्ट्री ऑफ लॉ ॲण्ड जस्टीस, लेजिस्लेटीव्ह डिपार्टमेट, नोटिफिकेशन, नवी दिल्ली यांनी दिनांक ०२.१२.१९८५ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यातील नमूद असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या त्याच बरोबर मा. राज्यपाल महोदयांच्या ०९ जून २०१४ च्या अधिसूचनेतील अटी शर्तींची पुर्तता करीत असलेल्या केवळ स्थानिक अनुसुचित जमाती या प्रवर्गातील उमेदवारच सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्यास पात्र असतील. |
| ४. | अर्जदार स्थानिक अनुसूचित जमातीचा असल्याचे व मा. राज्यपाल महोदयांच्या ९ जून २०१४ च्या अधिसुचनेतील अटी शर्तीची पुर्तता करीत असल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची राहील. |
| ५. | १. गुणानुक्रमे सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीपुर्वी त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन तसे वैधता प्रमाणपत्र अपर आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.<br>२. जो पर्यंत उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणार नाही तो पर्यंत त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही तसेच त्या कालावधी पर्यंत त्यांना कोणतेही वेतन / मानधन देण्यात येणार नाही. |
| ६. | शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. पी.आर. ई २००२/३३९५/ प्राशि-१ दिनांक २७ फेब्रुवारी २००३ अन्वये राज्यात सुधारित प्राथमिक शिक्षण सेवक योजना कार्यान्वित करण्यांत आली असुन सदर शासन निर्णयातील तरतुदीनूसार शिक्षण सेवकाचा कालावधी हा तीन वर्षे इतका राहील. |
| ७. | आश्रमशाळा समायोजन व इतर कारणांमुळे जाहिरातीत नमुद केलेल्या पदसंख्येत/ समांतर आरक्षणात कमी-अधिक बदल होऊ शकतो. त्यामुळे अर्ज केलेला कोणताही उमेदवार गुणवत्ता यादीत आला, किंवा उमेदवाराची कागदपत्र पडताळणी करण्यात आली म्हणून उमेदवार नियुक्तीवर आपला हक्क सांगू शकणार नाही. |
| ८. | उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांचा व सर्व सुचनांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने |

| | |
|---|---|
| | अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधिन राहून अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता / उमेदवार धारण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यांत येईल. |
| ९. | **शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र- आस्था-१००२/प्र.क्र.४५/का-१५ दिनांक १०.०८.२००५ व** वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रका अन्वये अपंग उमेदवारांच्या नियुक्ती संबंधात संबंधीत पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि सदर शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील निकष लक्षात घेवून त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने अथवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी नियुक्तीसाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबत.) |
| १०. | शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू असेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील. |
| ११. | विवाहीत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना त्यांच्या पुर्वाश्रमीच्या नावाने अर्ज करावा. |
| १२. | **शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र६८/क्रीयुसे-२ दिनांक** ३०/४/२००५ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण नसल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील (सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १३ | उमेदवारांने **महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५** अन्वये लहान कुटुंब असल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील. |
| १४ | ज्या उमेदवारांना विद्यापीठाने श्रेणी पध्दतीने (ग्रेड) गुणदान दिले असेल त्या उमेदवारांनी पदवी, पदयुत्तर पदवी किंवा डि. एड. / बी. एड. परीक्षेमधील निकालाच्या श्रेणीचे संबंधित विद्यापिठांकाडून गुणांमध्ये रुपांतर प्राप्त करुन अर्ज सादर करण्यांची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| १५ | सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,मंत्रालय,मुंबई-३२, दिनांक १ जुलै,२००५ नुसार दिनांक २८ मार्च,२००६ व तदनंतर तीसरे अपत्य जन्माला आले असल्यास ती अनर्हता ठरुन सेवा समाप्त करण्यांत येईल. |
| १६ | उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. |
| १७ | जिल्हानिहाय अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या जिल्हाच्या अनुसूचित क्षेत्रातील कायम रहीवाशी असतील त्या जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील आश्रमशाळांमध्येच नियुक्ती दिली जाईल. |
| १८. | आदिवासी विकास विभागातील सर्व शासकीय आश्रमशाळा निवासी असल्याने उमेदवारास मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील. |
| १९. | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर अंतर्गत चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यामधील अनुसूचित क्षेत्राची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |

## समांतर आरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना

| | | |
|---|---|---|
| १. | खेळाडू उमेदवार | खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त |

| | | |
|---|---|---|
| | | करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू<br>राज्य अजिंक्यपद स्पर्धा याचा सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यपेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळांडुचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.<br>अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र६८/क्रीयुसे-२ दिनांक ३०.०४.२००५ अन्वये जिल्हास्तर / राज्यस्तरीय खेळाडू शासन निर्णयानुसार जिल्हा क्रिडा अधिकारी / मा. संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्रमाणपत्र असलेले उमेदवार |
| २. | अंशकालीन उमेदवार | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र-पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयामध्ये त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीधारक तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र असलेले असे अंशकालीन उमेदवार. |
| ३. | माजी सैनिक / माजी सैनिक पाल्य | सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवेत असतांना कायमचे वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जाईल.) |
| ४. | प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त उमेदवार | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१.०१.१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र / २०२/०९/१६-अ दिनांक २७.१०.२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवारांचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे. |
| ५. | दिव्यांग उमेदवार | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र-माजअ-१००३/११८२/प्रक्र ८९/२००३/३४-अ दिनांक १६/०८/२००५ व आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र-आस्था-१००२/प्र.क्र. ४५/का-१५ दिनांक१०/०८/२००५ नुसार<br>अस्थिव्यंग उमेदवार :- एक हात / एका पायाने दिव्यांग उमेदवार<br>कर्णबधीर :- एक कानाने दिव्यांग उमेदवार<br>क्षीणदृष्टी :- एका डोळ्याने दिव्यांग उमेदवार<br>अर्ज सादर करेल त्या दिनकांपुर्वीचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील नुतनीकरण केलेल वैध असलेले ऑनलाईन प्रमाणपत्र असावे. |
| ६. | महिला उमेदवार | महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१ / मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. |

### आदिवासी विकास सेवा संवर्गातील गट क संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांचा (सामाजिक व समांतर आरक्षणानुसार) तपशिल दर्शविणारे विवरणपत्र

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | अनुसूचित जमाती | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदनाम | | पद संख्या | महिला ३०% | अपंग ३% | मा.सै. १५% | खेळाडू ५% | अंशकालीन कर्मचारी १०% | भुकंपग्रस्त २% | प्रकल्पग्रस्त ५% | अनाथ १% | सर्वसाधारण |
| १ | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | ३९ | १२ | ० | ५ | २ | ४ | ० | २ | ० | १४ |
| २ | प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | २७ | ८ | ० | ४ | ० | ३ | ० | ० | ० | १२ |
| ४ | माध्यमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | उच्च माध्यमिक शिक्षण सेवक | १३ | ४ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महि | :- | महिला | ५. | अंशका | :- | अंशकालीन कर्मचारी |
| २. | अपं | :- | अपंग | ६. | भुकंप | :- | भुकंपग्रस्त |
| ३. | मा.सै | :- | माजी सैनिक | ७. | प्रक | :- | प्रकल्पग्रस्त |
| ४. | खेळा | :- | खेळाडू | ८. | सर्वसा | :- | सर्वसाधारण |

## ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

अनुसूचित जमातीच्या अर्जदाराने या जाहिरातीसमवेत असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील गावांची यादी पाहावी. त्या यादीत उमेदवाराचे गाव असेल तरच या जाहिरातीतील पदांसाठी अर्ज करावा. सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत https:// maharecruitment. mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक (Link) उघडावी.

| | |
|---|---|
| १. | भरती प्रक्रियेसंबंधीच्या सर्व अटी-शर्ती असलेल्या माहिती पत्रिकेची प्रिंट काढावी. |
| २. | जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आपण जर सदर पदास पात्र ठरत असाल तर संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावा. |
| ३. | अर्जात नमूद केलेले सर्व रकाने भरल्यानंतर अर्जात फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या ठिकाणावर अपलोड करावी. |
| ४. | अर्जदाराने परिपुर्ण भरलेला अर्जाचे प्रिंट काढून आपल्यासोबत जतन करावी. गुणवत्ता यादीमध्ये उमेदवाराचे नांव असल्यास उमेदवाराला कागदपत्र पडताळणीच्या वेळी ऑनलाईन अर्जाची प्रिंट सादर करणे बंधनकारक आहे. अर्जाची प्रिंट कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर न केल्यास आपली कागदपत्र पडताळणी केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ५. | उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर त्यास अर्जाची सद्यस्थिती कळावी, कागदपत्र पडताळणी सुचनापत्र उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक उमेदवारने स्वत:चा ई-मेल आय.डी. तयार करुन, मोबाईल क्रमांक आणी ई-मेल आय.डी. अर्जात नमूद करणे बंधनकारक आहे. भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर सुरु ठेवणे आवश्यक आहे. सदर भरती बाबतची आवश्यक ती माहिती आपणांस ई-मेल आय.डी. वर पाठविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६. | उमेदवाराला एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. |
| ७. | ऑनलाईन भरलेला अर्ज व प्रत्यक्षात सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्ज रद्द **करण्यांत येईल. व यापुढील सर्व निवडी करीता अपात्र** ठरविण्यात येईल. |
| ८. | उमेदवारांचे अर्ज स्विकारणे, समांतर आरक्षण व विषय निहाय गुणवत्ता यादी तयार करुन प्रसिध्द करणे इत्यादी प्रक्रियेकरिता रु.७००/- प्रति विद्यार्थी / प्रती अर्ज याप्रमाणे शुल्क लागू आहे. सदरचे शुल्क हे केवळ ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारले जाईल. |

(हृषीकेश मोडक)
**अपर आयुक्त,**
आदिवासी विकास, नागपूर